खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### रासेयो विभाग : विशेष करोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कोरोना लशीकरण

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने दि. २६ व २७ ऑक्टोबर रोजी विशेष कोविड प्रतिबंधक लशीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी व प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी दिली.



महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात झालेली असल्याने विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधक लशीच्या दोन्ही मात्रा घेणे आवश्यक आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अद्याप लशीकरण झालेले नाही तसेच ज्या विद्यार्थ्यांची पहिली मात्रा पूर्ण होऊन दुसऱ्या मात्रेसाठी आवश्यक कालावधी पूर्ण झालेला आहे, अशा सर्व विद्यार्थी व पालकांनी आपल्या आधारकार्डसह लशीकरणासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात उपस्थित राहावे; असे आवाहन संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले आहे.

पुढारी

# राजगुरू महाविद्यालयात लसीकरण

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयात राज्य शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेंतर्गत विशेष कोविड-१९ लसीकरण शिबिराचे मंगळवारी (दि. २६) आयोजन करण्यात आले होते. लसीकरण मोहिमेचे उद्‌घाटन संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पंचायत समितीचे सभापती अरुण चौधरी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी माजी सभापती अंकुश राक्षे, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, डॉ. चंद्रगुप्त मखरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, मेजर ए. बी. कानवडे उपस्थित होते.



लसीकरण शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील.

याप्रसंगी अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी, अठरा वर्षे पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी लसीकरण करून शासनाच्या युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या शिबिरात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्यासह डॉ. चंद्रगुप्त मखरे, आरोग्यसेवक आशा जीवने, सतीश मोरे, वर्षाराणी वाळुंज, छाया नेवसे, सोनाली सावंत, अतिश काळबांडे यांच्यासह आशा वर्कर सुवर्णा कानडे, दीपाली कोबल सहभागी झाल्या. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि विद्यार्थी विकास मंडळ विभागांनी लसीकरण शिबिराचे नियोजन केले.

प्रा. गणेश धुमाळ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. आर. थोरात यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नीता डोंगरे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Oct 27, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुणे आवृत्ती बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द
RNI No. MAHMAR/2013/57952
गुरुवार, दि. २८ ऑक्टोबर २०२१ • वर्ष : ९ • अंक : ३९ • पाने ८ • किंमत २ रूपये www.j

# राजगुरू महाविद्यालयात कोविड लसीकरण मोहिमेचे आयोजन

राजगुरुनगर
जनप्रवास प्रतिनिधी



येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेंतर्गत विशेष कोविड लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या संधीचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी लसीकरणास हजेरी लावली. या सामूहिक लसीकरण मोहिमेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पंचायत समितीचे सभापती अरुण चौधरी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी माजी सभापती अंकुश राक्षे, संचालक डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, डॉ. चंद्रगुप्त मखरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, मेजर ए.बी. कानवडे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह महाविद्यालय सुरू झाले असल्याने विद्यार्थ्यांच्या लशीच्या दोन्ही मात्रा होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. कोरोनाचा धोका अद्याप पूर्णपणे टळलेला नसून अठरा वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी लसीकरण करून शासनाच्या युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. या शिबिरात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्यासह डॉ. चंद्रगुप्त मखरे, आरोग्य सेवक आशा जीवने, सतीश मोरे, वर्षाराणी वाळुंज, छाया नेवसे, सोनाली सावंत, अतिश काळबांडे यांसह आशा वर्कर सुवर्णा कानडे, दिपाली कोबल सहभागी झाल्या. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि विद्यार्थी विकास मंडळ विभागांनी लसीकरण शिबिराचे नियोजन केले. प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन प्रा.एस.आर.थोरात यांनी तर आभार प्रा.नीता डोंगरे यांनी मानले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी

कम्प्युलटर देण्यात आले. बनावण्यात आले होते. प्रणिताताई शिंदे, संगमनेर राव नवल, अमृत सागर दुध

# कोविड लसीकरण मोहिमेचे आयोजन

राजगुरुनगर
गांवकरी प्रतिनिधी




राजगुरुनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेंतर्गत विशेष कोविड लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या संधीचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी लसीकरणास हजेरी लावली. या सामूहिक लसीकरण मोहिमेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पंचायत समितीचे सभापती अरुण चौधरी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी माजी सभापती अंकुश राक्षे, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, डॉ. चंद्रगुप्त मखरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, मेजर ए.बी. कानवडे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह महाविद्यालय सुरु झाले असल्याने विद्यार्थ्यांच्या लशीच्या दोन्ही मात्रा होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. कोरोनाचा धोका अद्याप पूर्णपणे टळलेला नसून अठरा वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी लसीकरण करून शासनाच्या युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. या शिबिरात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्यासह डॉ. चंद्रगुप्त मखरे, आरोग्य सेवक आशा जीवने, सतीश मोरे, वर्षाराणी वाळुंज, छाया नेवसे, सोनाली सावंत, अतिश काळबांडे यांसह आशा वर्कर सुवर्णा कानडे, दिपाली कोबल सहभागी झाल्या. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि विद्यार्थी विकास मंडळ विभागांनी लसीकरण शिबिराचे नियोजन केले. प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन प्रा.एस.आर.थोरात यांनी तर आभार प्रा.नीता डोंगरे यांनी मानले.

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

# राजगुरू महाविद्यालयात कोविड लशीकरण मोहिम

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य लशीकरण मोहिमेंतर्गत विशेष कोविड लशीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या संधीचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी लशीकरणास हजेरी लावली.



या सामुहिक लशीकरण मोहिमेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पंचायत समितीचे सभापती अरुण चौधरी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी माजी सभापती अंकुश राक्षे, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, डॉ. चंद्रगुप्त मखरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, मेजर ए. बी. कानवडे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह महाविद्यालय सुरू झाले असल्याने विद्यार्थ्यांच्या लशीच्या दोन्ही मात्रा होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. कोरोनाचा धोका अद्याप पूर्णपणे टळलेला नसून अठरा वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी लशीकरण करून शासनाच्या युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन प्रा.एस.आर.थोरात यांनी तर आभार प्रा.नीता डोंगरे यांनी मानले.

लोकमत

# राजगुरू महाविद्यालयात लसीकरण मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेंतर्गत विशेष कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी लसीकरणास हजेरी लावली.

या सामूहिक लसीकरण मोहिमेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पंचायत समितीचे सभापती अरुण चौधरी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी माजी सभापती अंकुश राक्षे, संचालक डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, डॉ. चंद्रगुप्त मखरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा.ए. बी. कानवडे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह महाविद्यालय सुरू झाले असल्याने विद्यार्थ्यांच्या लसीच्या दोन्ही मात्रा होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. कोरोनाचा धोका अद्याप पूर्णपणे टळलेला नसून अठरा वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी लसीकरण करून शासनाच्या युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Oct 28, 2021
Powered by: erelego.com

HDM

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**